# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 23/09/2023 (शनिवार) सकाळ


---

## महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधित असलेल्या
## अवैध सुगंधी तंबाखुची साठवणूक करून विक्री करणाऱ्या आरोपीला अटक
## स्थानिक गुन्हे शाखेची कार्यवाही

दिनांक २२/०९/२०२३ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक पोलीस स्टेशन कन्हान हद्दीत पेट्रोलिंग करीत असतांना गुप्त बातमीदारांमार्फत खबर मिळाली की, इंदिरा नगर कन्हान कैलास जनबंधु यांचे राहते घरी गोडावुन मध्ये प्रतिबंधित असलेला सुगंधित तंबाखुची साठवणूक करून ठेवलेली आहे. अशा मिळालेल्या माहिती वरून नमुद गोडावुनमध्ये प्रतिबंधित असलेल्या सुगंधित तंबाखु बाबत रेड केली असता एका हिरव्या रंगाच्या प्लास्टीक चुंगडीमध्ये महाराष्ट्र प्रतिबंधित असलेला सुगंधित तंबाखु व पान मसाला दिसुन आला. १) सुगंधित तंबाखु हमसफर जर्दा – १७ पॅकेट ५०० ग्रॅमचे एकुण ८५००/–रू. ग्रॅम प्रत्येकी किंमती २५०/– रू. प्रमाणे ४,२५०/– रूपयाचा मुद्देमाल (२) जनम सुगंधित तंबाखु ०८ पॅकेट ५०० ग्रॅमचे एकुण ४०००ग्रॅम प्रत्येकी किंमती २५० रू. प्रमाणे २,०० रू. चा मुद्देमाल (३) होला हुक्का शिशा तंबाखु – ०२ पॅकेट २०० ग्रॅमचे एकुण ४०० ग्रॅम प्रत्येकी किंमती १६८ रू. प्रमाणे ३२८ रू. चा माल (४) बागवान सुगंधित तंबाखु – ०३ टिनाचे डब्बे ५०० ग्रॅमचे एकुण १५०० ग्रॅमचे प्रत्येकी किंमत ७२५ रूपये, प्रमाणे २१७५ रू. चा माल (५) रत्ना ३००० सुगंधित तंबाखु २० टिनाचे डब्बे ५० ग्रॅमचे एकुण १००० ग्रॅम प्रत्येकी किमत ११८ रू प्रमाणे २,३६० रू. चा माल (६) पान पराग पान मसाला ७ पॅकेट प्रत्येकी पॅकेट २५० रू प्रमाणे १४०० रू. चा माल (७) विमल पान मसाला ०९ पॅकेट प्रत्येकी पॅकेट १९८ रू. प्रमाणे १,७८२ रू चा माल असा एकुण किंमती १३,७९५ /– रूपयाचा मुद्देमाल सदर **आरोपी नामे– संजय हरिलाल गंगवानी, वय ५० वर्ष, रा. जागनाथ मंदिर के पास कामठी** यास प्रतिबंधित व आरोग्यास हानिकारक असलेला सुगंधित तंबाखु व पान मसालाचे मालकी हक्काबाबत विचारणा केली असता त्याने सदरचा मुद्देमाल हा त्याचा स्वतःचे मालकीचा असल्याचे व ग्राहकांना विक्री करण्याकरीता साठवुन ठेवल्याचे सांगीतले प्रतिबंधित असलेला सुगंधित तंबाखु १४,९०० ग्रॅम किंमती १०,६१३ रू. पान मसाल्याचे १६ पॅकेट किंमती ३१८२ रू. असा एकुण १३,७९५ रू. चा मुद्देमाल मिळुन आल्याने आरोपीविरूद्ध कलम १८८, २७२, २७३, ३२८ भादंवि कायदयान्वये गुन्हा नोंद करून तपासात घेतला.

सदरची कार्यवाही ही पोलीस अधिक्षक नागपूर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार (भा.पो.से.), अपर पोलीस अधिक्षक नागपूर ग्रामीण श्री. डॉ. संदिप पखाले यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. ओमप्रकाश कोकाटे, पोलीस उपनिरीक्षक बट्टुलाल पांडे, पोलीस हवालदार नाना राऊत, विनोद काळे, इक्बाल शेख, पोलीस नायक संजय बरोदीया, वीरेंद्र नरड, मोनु शुक्ला यांनी पार पाडली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर